**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

---

**दिनांक २७.०९.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**१) गुन्हेशाखा पोलीसांची कामगिरी :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता बांधुन तसेच, वाहतुककरीता कोंडुन ठेवणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २७.०९.२०२६ चे ०३.५० वा. ते ०८.१५ वा. चे दरम्यान, भुमाफीया विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या माहीतीवरून, पोलीस ठाणे नविन कामठी हद्दीत, गादा ते नेरी रोडवरील गादा शिवारातील हनी डेअरी फार्म येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे टाटा मोटर्स कंपनीचा ट्रक क्र. एम.एच ४० एन ७५१७ यामध्ये लहान मोठी एकुण २१ जिवंत गोवंशीय जनावरे तसेच, ट्रक क्र. एम.एच ४० बि.जी ४०७६ यामध्ये लहान मोठी एकुण २६ गोवंशीय जनावरे यांना अवैधरित्या, निर्दयतेने चारा—पाणी न देता बांधुन ठेवल्याचे दिसुन आले. तसेच, घटनास्थळी लहान मोठी एकुण २९ गोवंशीय जनावरे यांना अवैधरित्या, निर्दयतेने चारा—पाणी न देता बांधुन ठेवल्याचे दिसुन आले. एकुण ७६ गोवंशीय जनावरे यांची सुटका करण्यात आली. आरोपी १) हनी डेअरी फार्म चा मालक नामे मोहम्मद आसिम २) ट्रक क्र.एम.एच. ४० एन. ७५१७ चा मालक ३) चालक ४) क्लीनर, ५) ट्रक क्र. एम.एच. ४० बि.जी ४०७६ चा मालक ६) चालक ७) क्लीनर यांनी नमुद गोवंशीय जनावरे यांना कत्तली करीता बांधुन ठेवल्याचे तसेच, ट्रकमधुन वाहतुक करून नेण्याचे तयारीत असल्याचे निष्पन्न झाले. घटनास्थळावरून व ट्रकमधुन एकुण ७६ गोवंशीय जनावरे, दोन ट्रक, ०१ स्प्लेंडर मोटार सायकल क्र. एम.एच २८ ए.ई ८६६७, ॲक्टीवा मोपेड क्र. एम.एच ४० सि. १८७७, टि.व्ही.एस कंपनीची ईलेक्ट्रीक दुचाकी क्र. एम.एच ४० सि. १८७७ व एक पांढऱ्या रंगाची विनानंबर प्लेटची ॲक्टीवा मोपेड असा एकुण अंदाजे ६४,८०,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. गोवंशीय जनावरे यांना गौशाला पशुपालन बहुउद्देशिय संस्था, बिडगांव, नागपुर येथे पालन—पोषण व देखभालीकरीता ताब्यात देण्यात आलेले आहे.

याप्रकरणी पोलीस ठाणे नविन कामठी येथे आरोपींविरूध्द कलम ५(अ), ५(२) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम—१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ११(१)(ड),(फ),(ह),(आय) प्राणी क्रुरता अधिनियम—१९६० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन, आरोपींचा शोध सुरू आहे. **आरोपी मिळुन आल्यानंतर, त्यांचे गुन्हे अभिलेखाची पडताळणी करून, त्यांचेवर सबळ गुन्हे आढळुन आल्यास, त्यांचेविरूध्द कायदेशिर कठोर कारवाई करण्याची तजविज आहे.**

**तसेच,** वरील कार्यवाही पुर्ण करून, परत जात असतांना, मिळालेल्या माहीतीवरून, गादा—नेरी रोडचे बाजुला, ठाकरे पोल्ट्री फार्म समोर ०९.१५ वा. चे सुमारास, बोलेरो पिक—अप वाहन क्र. एम.एच ४० बि.एल ५००९ ची पाहणी केली असता, त्यामध्ये एकुण ०३ गोवंशीय जनावरांना अवैधरित्या, निर्दयतेने चारा—पाणी न देता कोंबुन व बांधुन ठेवल्याचे दिसुन आले. वाहनचालकास त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव आकाश मदन इलमे, वय २८ वर्षे, रा. भोसा, तह. मोहाडी, जि. भंडारा असे सांगीतले. जनावरांबाबत विचारले

असता, त्याने गाडीमालक अंकुश हटवार, वय ३५ वर्षे, रा. आंबागड, तह. मोहाडी, जि. भंडारा याची असुन, त्याने हनी डेअरी फार्मचा मालक मोहम्मद आसिम, रा. कामठी याचेकडे विक्रीकरीता पाठविल्याचे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन बोलेरो वाहन व ०३ गोवंशीय जनावरे असा एकुण ९,७५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी बोलेरो चालक व गाडीमालक तसेच, हनी डेअरी फार्म मालक यांचेविरूध्द कलम ५(अ),(ब),९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम—१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ११(१)(ड),(ह) प्राणी क्रुरता अधिनियम— १९६० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. ०३ गोवंशीय जनावरांची सुटका करून, त्यांना गौशाला पशुपालन बहुउद्देशिय संस्था, बिडगांव येथे दाखल केले आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मपोनि. संजीवनी थोरात, पोनि. प्रशांत ठवरे, पोहवा. सारंग बालपांडे, भागवत वानखेडे, महेश सेलोकार, प्रमोद पिंपळीकर, शेख इमरान, सुभान गलाकाटु, पोअं. अमर गणविर व विवेक लांबे, गुन्हेशाखा भुमाफीया विरोधी पथक व युनिट क्र. १ चे अधिकारी व अंमलदार यांनी संयुक्तपणे केली.





**<u>२) सोनेगांव पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास घातक शस्त्रासह अटक.</u>**

दिनांक २६.०९.२०२६ चे २३.१० वा. चे सुमारास, सोनेगांव पोलीसांचे तपास पथक हे पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, पोलीस ठाणे हद्दीत हनुमान मंदीर जवळ, राहुल नगर झोपडपट्टी, सोमलवाडा, नागपुर येथे एक इसम हातात शस्त्र घेवुन धुमाकुळ घालत आहे. अशा खात्रीशीर माहीतीवरून नमुद ठिकाणी गेले असता, प्राप्त वर्णनाचा ईसम शस्त्रासह धुमाकुळ घालतांना दिसुन आला. त्यास घेराव टाकुन ताब्यात घेवुन निशस्त्र केले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव विजय कन्हैय्यालाल बेलवंशी उर्फ पांडा, वय २७ वर्षे, रा. राहुल नगर झोपडपट्टी, सोनेगांव, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी चाकु किंमती २५०/—रू. चा जप्त करण्यात आला. आरोपीला पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. १०/२०२४, दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्रासह धुमाकुळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे सोनेगांव येथे आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १४२, १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. सिंगारेड्डी ऋषीकेश रेड्डी पोलीस उप आयुक्त (परि. क्र. १), मा. श्री. यशवंत नलावडे सहा. पोलीस आयुक्त

(सोनेगांव विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. राहुल तसरे, पोउपनि. विक्रांत कारटकर, पोअं. नविन, हो.सै. अंकुश सोनेकर यांनी केली.

**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे जरीपटका :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २४.०९.२०२६ चे १८.०० वा. ते दिनांक २७.०९.२०२६ चे १०.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत, प्लॉट क्र. ३१७७, नारा वस्ती, झेंडा चौक जवळ, नागपूर येथे राहणारे फिर्यादी राज कुंजीलाल बैसवारे, वय ३७ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन पत्नीला आणण्याकरीता पुणे येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मागील दाराचे कुलुप तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील आलमारीतील रोख ९०,०००/—रू. व सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ५,३१,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे पोउपनि. आकाश महल्ले यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे कपीलनगर</u> :—** दिनांक २७.०९.२०२६ चे ०३.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीत नाका नं. २, प्लॉट नं. ५४, रझा टाऊन, कामठी रोड, कपीलनगर येथे राहणारे सफौ. रविंद्र महादेवराव कोकांडे, वय ५६ वर्षे, ब.नं. ७७८, नेमणुक पोलीस मुख्यालय, नागपुर शहर यांची अचानक प्रकृती बिघडल्याने, त्यांना उपचाराकरीता होप हॉस्पिटल, टेका नाका येथे व तेथुन प्लॅटीना हॉस्पीटल, धंतोली व तेथुन मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, उपचारादरम्यान ११.२७ वा. डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले. याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे कपीलनगर येथे अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

सफौ. रविंद्र महादेवराव कोकांडे हे पोलीस मुख्यालय, नागपुर शहर येथे कार्यरत होते. तेथुन गणपती विसर्जन बंदोबस्तकरीता पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत कर्तव्यावर होते. दिनांक २७.०९.२०२६ चे ०१.३० वा. चे सुमारास आपले कर्तव्य पुर्ण करून, घरी गेले व जेवन करून झोपले होते. ०३.३० वा. चे सुमारास अचानक त्यांच्या छातीत त्रास होत असल्याबाबत त्यांनी मुलाला सांगीतल्याने, मुलगा ऋषभ वय २७ वर्षे याने त्यांना तातडीने हॉस्पीटल येथे नेले होते. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यु झाला. त्यांच्या मनमिळावु स्वभावामुळे ते सहकाऱ्यांमध्ये आवडते होते. त्यांचे अचानक निधनामुळे सर्वाना धक्का बसलेला असुन, नागपुर शहर पोलीस दलाने एक कर्तव्यदक्ष व प्रामाणीक पोलीस अधिकारी गमावलेले आहे. त्यांचे पश्चात कुटुंबात त्यांच्या पत्नी श्रीमती शिला कोकांडे, मुलगा ऋषभ वय २७ वर्षे व रोहीत वय २५ वर्षे असे सदस्य आहेत. नागपुर शहर पोलीस दलातर्फे वरीष्ठ पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे उपस्थितीत त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली देवुन, शासकीय ईतमामात बंदुकीच्या फैरी झाडुन शोकसलामी देण्यात आली. कपीलनगर घाट येथे त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आला.

**स्वा/—**

**( नितीन चुलपार )**

**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**